महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एचजीआर-१.१२४/प्र.क्र.५३५/२०२४/जाहिरात जाहिरात क्रमांक - ०३६/२०२४

माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन, शासनाच्या गृह विभागाच्या मागणीनुसार, राज्य व विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणावरील रिक्त असलेल्या सदस्यांच्या पदावर नियुक्तीकरीता अर्हताप्राप्त सेवानिवृत्त उमेदवारांचे पॅनेल तयार करुन देण्याकरीता अर्हताधारक उमेदवारांकडून ऑफलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. **वेतन व भत्ते:-** नियत वेतन व भत्ते रु.१,३७,७००/- दरमहा (शासन अधिसूचना, गृह विभाग, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ मधील नियम क्रमांक ४ मधील तरतुदी लागू राहतील.)

३. **पात्रता:-**

**३.१ राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण, मुंबई**

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | पात्रता | नियुक्तीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | सदस्य - राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण | ०१ | विशेष पोलीस महानिरिक्षकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला नियत वयोमानाने सेवानिवृत्त पोलीस अधिकारी | ३ वर्षे |
| २ | सदस्य - राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण | ०१ | राज्य शासनाच्या सचिव दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला सेवानिवृत्त अधिकारी | |

**३.२ विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण**

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | पात्रता | नियुक्तीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नागपूर | ०१ | पोलीस अधीक्षक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला नियत वयोमानाने सेवानिवृत्त अधिकारी | ३ वर्षे |
| २ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नवी मुंबई (कोकण) | ०१ | | |
| ३ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, अमरावती | ०१ | | |
| ४ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर | ०१ | | |
| ५ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, पुणे (नजिकच्या काळात रिक्त होईल) | ०१ | | |
| ६ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नाशिक (नजिकच्या काळात रिक्त होईल) | ०१ | | |

४. **सर्वसाधारण अटी व शर्ती:-**

४.१ महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०१४, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१४ अन्वये पोलीस तक्रार प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली असून त्यातील नियमांनुसार तसेच वेळोवेळी सुधारण्यात येणा-या कार्यनियमावली / कार्यपध्दतीनुसार प्रस्तुत पदांची निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. प्रस्तुत प्रकरणी शासन अधिसूचना, गृह विभाग, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण (सेवेच्या शर्ती) नियम २०१६ मधील तरतुदी लागू राहतील.

४.२ नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात टंकलिखित करुन आयोगास सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, त्रिशुल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांचे नावे **दिनांक १० एप्रिल, २०२४ पर्यन्त** पोहोचतील, अशा बेताने पाठवावे. कोणत्याही कारणास्तव अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज ग्राह्य न समजता रद्द करण्यात येतील. (अर्ज नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात यावेत.)

४.३ अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी ते विशेष पोलीस महानिरिक्षकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी / राज्य शासनाच्या सचिव दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी / पोलीस अधीक्षक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी या संबंधित पदावरुन नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाले असल्याबाबतचे शासनाने दिलेले सेवानिवृत्तीनंतरचे ओळखपत्र तसेच संबंधित पदावरील नियुक्ती आदेशाची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

४.४ सदर पदभरतीची संपूर्ण जाहिरात www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण: नवी मुंबई

दिनांक: २१ मार्च, २०२४

उप सचिव (जाहिरात)

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# अर्जाचा नमुना

**राज्य व विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणावरील रिक्त असलेल्या सदस्यांच्या पदावर नियुक्तीकरीता अर्हताप्राप्त सेवानिवृत्त उमेदवारांचे पॅनेल तयार करुन देण्याबाबत अर्हताधारक उमेदवारांकडून ऑफ लाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.**

(१) **अर्ज करावयाच्या पदाचे नांव:**

| अ.क्र. | पदाचे नाव | अर्ज करावयाच्या पदासमोर (✓) अशी खूण करण्यात यावी. |
|---|---|---|
| १ | सदस्य - राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण - विशेष पोलीस महानिरिक्षकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला नियत वयोमानाने सेवानिवृत्त पोलीस अधिकारी | |
| २ | सदस्य - राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण - राज्य शासनाच्या सचिव दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला सेवानिवृत्त अधिकारी | |
| ३ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नागपूर | |
| ४ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नवी मुंबई (कोकण) | |
| ५ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, अमरावती | |
| ६ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर | |
| ७ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, पुणे (नजिकच्या काळात रिक्त होईल) | |
| ८ | सदस्य - विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नाशिक (नजिकच्या काळात रिक्त होईल) | |

(२) उमेदवाराचे नांव: -----------------------------------------------

(३) संपर्क तपशील :-

३.१ सध्याचा पत्ता - ------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक - ----------------------------------------

ई मेल - ------------------------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक - -------------------------------------

३.२ कायमचा निवासी पत्ता - --------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

--------------------------------------------

(४) जन्मदिनांक -

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

(५) सेवा निवृत्तीचे वेळी धारण केलेले पद - ------------------------------

(६) सेवा निवृत्तीचा दिनांक -

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

(७) सेवा तपशील:-

(८) विशेष प्राविण्य :-

(९) सेवेतील उल्लेखनीय कामगिरी:-

(१०) आपल्या विरुध्द कोणतीही न्यायालयीन कारवाई/खटला प्रलंबित / सुरु आहे का? / होता का?
असल्यास त्याबाबतचा तपशील नमूद करावा:-

(११) आपल्या विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई/विभागीय चौकशी अथवा अन्य चौकशी चालू आहे का? / होती का?:-
असल्यास त्याबाबतचा तपशील नमूद करावा:-

मी श्री/श्रीमती ...................................................................................... असे प्रमाणित करतो/करते की, मी, राज्य व विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणावरील रिक्त असलेल्या सदस्यांच्या पदावर नियुक्तीकरीता प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील तपशील वाचला असून, सदर पदासाठी विहित केलेली अर्हता धारण करीत असल्याने सदर पदावर नियुक्तीसाठी अर्ज सादर करीत आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खरी असून, खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जाऊ शकतो, याची मला जाणीव आहे.

सही - ............................................

नाव - ............................................

सेवा निवृत्तीचे पदनाम - .......................

सहपत्रे - सेवा निवृत्तीनंतर शासनाने दिलेल्या ओळखपत्राची प्रत तसेच त्या पदावरील नियुक्ती आदेशाची प्रत